Review Of Research
Vol. 3 | Issue. 6 | March. 2014
ISSN:-2249-894X

Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# भंडारा जिल्हा मत्स्य उत्पादक सहकारी संघाच्या मत्स्य योजना: एक अध्ययन

**डॉ. महादेव मारोती बन्सू[१] , डॉ. दिलीप वैरागडे[२]**
**[१]संशोधक , डॉ. एल.डी.बलखंडे कला व वाणिज्य महाविद्यालय पवनी जि.भंडारा.**
**[२]मार्गदशक, विमेन्स् कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, नागपुर.**

**साराशं**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्यायनामुळे भंडारा जिल्हा मत्स्य उत्पादक सहकारी संघाच्या मत्स्य योजनाशी निगडीत असणा—या लोकांच्या जीवनावरील आर्थिक, सामाजिकस्थिती, जीवन—जगण्याची पद्धत, व्यवसाय, याबाबत माहिती समाजातील इतरांनाही होईल. मासेमारींच्या अनेक समस्या आहेत. त्या पूर्ण करण्यासाठी सामाजिक कार्य करायला सहकारी संस्था विशिष्ट पद्धतीने मासेमारींच्या समस्या सोडविण्याचे काम करीत आहे.

**प्रस्तावना**

सहकाराच्या बहुतेक व्याख्येत सहकार म्हणजे व्यक्तीचे संघटन असे स्पष्ट करण्यात आले आहे. अनेक व्यक्ती आपल्या आर्थिक उन्नतीसाठी एकत्र येवून सहकारी संस्था स्थापन करतात त्या सर्व व्यक्तीचे सहकारी संस्थेत एकत्रिकरण होत असते. **''एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ''** हा सहकाराचा मुलमंत्र आहे. या मुलमंत्राप्रमाणे सहकारी संस्थेत सर्व सभासद कामे करीत असतात. तसेच सभासदांनी संस्थेला पुरविलेल्या भांडवलास दुय्यम स्थान असते. सहकारी संस्था सभासदांना पुरविलेल्या भांडवलापेक्षा सभासद या व्यक्तीला जास्त महत्व देतात. कंपनी या संघटन प्रकारात भांडवला जास्त महत्व दिले जाते. कंपनी मध्ये सभासदांनी पुरविलेल्या भांडवलाच्या प्रमाणात मते देण्याचा अधिकार असते. याउलट सहकारी संस्थेत सभासदानं कितीही भांडवल पुरविले तरी त्यास **'एक सभासद एक मत'** या तत्वानुसार मत देण्याचा अधिकार असतो. थोडक्यात सहकारी संस्थेत भांडवलापेक्षा सभासद व्यक्तींना जास्त महत्व असते म्हणूनच सहकार म्हणजे व्यक्तींच संघटन म्हटले जाते.

**भंडारा जिल्हा मत्स्य उत्पादक सहकारी संघाच्या मत्स्य योजना**

**(१) मत्स्य व्यवसायाला शासनाचे प्रोत्साहन व त्याची प्रगती :—**

सुरवातीस पंरपरागत शेती म्हणून या व्यवसायाला स्थान होते. दिवसेंदिवस तांत्रिक प्रगती ज्ञानावर मत्स्यापासुन परकीय चलन मिळू लागली आणि अन्न समस्येवर तोडगा यामुळे या व्यवसायाकडे शासनाचे लक्ष गेले. आणि आज देशात एक मोठा व्यवसाय म्हणून गणल्या जात आहे. त्याकरीता मोठमोठया संशोधन संस्था, तांत्रिक अधिकाऱ्यांची नियुक्ती, कार्यालयीन यंत्रणा, संघ, बर्फ कारखाने, शितगृहे, समुद्रालगत मासळी सुकवन आगार, भुकटी कारखाने,

मत्स्यबिज उपवनी केंद्र नाना तऱ्हेचे सहाय्यक व्यवसाय सुरू केलेत त्यात लाखो लोकांना रोजगार उपलब्ध झाला. हजारो लोकांचा पोटापाण्याचा प्रश्न सुटला. परकीय चलन मिळू लागली रोजच्या आहारात मासे मिळू लागलेत.

त्याचप्रमाणे शासनाचे या व्यवसायाकरीता कित्येक योजना, एकात्मिक ग्रामिण विकास योजना, विमा योजना, प्रशिक्षण योजना.

१) मत्स्यबिज २) उत्पादन योजना, मत्स्यसंवर्धन योजना इत्यादी राबविल्या जात आहेत. निरनिराळया योजनेतून जास्तीत जास्त मच्छिमार आकृष्ट व्हावीत या दृष्टीने अनुदान सुध्दा देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | अनुदान (टक्के) | कर्ज (टक्के) |
|---|---|---|---|
| १. | मत्स्यबिज खरेदी | ३३.३३ | ६६.६७ |
| २. | खताचा पुरवठा | २५ | ७५ |
| ३. | तलावातील गाळ काढणे | ५० | ५० |
| ४. | पाणी जाण्याच्या मार्गावर जाळी बसविणे | २५ | ७५ |
| ५. | नॉयलान सुताचा पुरवठा | ५० | ५० |
| ६. | नौका/डोंगे | ५० | ५० |
| ७. | संगोपण तलाव बांधणे | २० | ८० |
| ८. | हापे खरेदी | ५० | ५० |

शासन वरील प्रमाणे अनेक योजना राबवित असली तरी त्या कित्येक मच्छीमारांना माहितच नाही. ऐवढया मोठया प्रमाणात शासन अनुदान व कर्जे देवून हा व्यवसाय वाढीस लावण्याकरीता लोकाना प्रोत्साहन देते तरी या योजना जिल्हयात कितपत राबविल्या गेल्या त्यांचा सारांश पुढीलप्रमाणे :–

**१) विमा योजना :–**

मच्छिमार समाज दुर्बल घटाकातील म्हणून आजही जगत आहे. उदरनिर्वाहासाठी नदी, तलाव, समुद्र इत्यादी ठिकाणी जिवावर उदार होवून थंडी, उन, वारा, पाऊस यामध्ये मच्छीमारी करतो. मच्छिमारी करतांना जर संकट आले किंवा प्राण गमवावे लागले तर त्यांच्या कुटुंबियांना काही आर्थिक मदतीची गरज पडते त्यादृष्टीने ''भारतीय मत्स्यजीवी सहकारी संघ मर्या. नवी दिल्ली'' यांनी मे १९९१ मध्ये मच्छिमारांसाठी अनिवार्य विमा योजना लागू करण्यात यावी असा प्रस्ताव मांडला त्यानुसार युनायटेड इन्शुरंस कंपनीने '' मच्छिमारांचा विमा'' उतरविण्याचे काम सुरू केले. प्रत्येक मच्छिमाराला वर्षाकाठी रू. १२ भरावी लागतात. परंतू एवढी रक्कम भरण्याचे धाडस कोणी करणार नाही या दृष्टीने केंद्रान ५० टक्के व उरलेल्या ५० टक्के मधुन राज्याने २५ टक्के अनुदान मंजूर केले म्हणजे सद्या मच्छिमारास फक्त २५ टक्के म्हणजे रू. ३ भरावे लागतात. मासेमारी करतांना अपघाताने ज्या मचिछमाराचा मृत्यु झाल्यास त्याचे वारसाला या योजनेतून रू. ५०,००० चे आर्थिक सहाय्य शासनामार्फत दिले जाते.

**२) सदस्य शिक्षा कार्यक्रम :–**

कॅनेडियन को–ऑपरेटिव्ह असोशिएन पुरस्कृत '' एन.सी.यु.आई.फिशकॉफेड मत्स्य सहकारी योंके सदस्यो की शिक्षा'' परीयोजना या नावाची परीयोजना संघाचे अंतर्गत कार्यरत असून योजनेचे उद्देश मत्स्य व्यवसाय संस्थांचे सभासदांना प्रशिक्षित करणे हे आहे. या योजने अंतर्गत मच्छिमार युवकांना तांत्रीक पध्दतीने त्याच्या व्यवसायाचे ज्ञान असणे हि महत्वाची गरज समजून महाराष्ट्र शासनाने निरनिराळया ठिकाणी प्रशिक्षणाची सोय केली.

**३) विशेष घटक योजना :–**

ही योजना विशेषत: मागासवर्गीय जातीतील लोकांकरीता राबवीली जाते. या योजनेअतंर्गत शासनाचे तलावात मत्स्यबीजाची साठवणूक २ वर्षापर्यंत केल्यानंतर अनुसूचित जाती लोकांची सहकारी संस्था स्थापन करून ठेका पध्दतीने

तलाव दिले जातात. हया मधील मत्स्यबीज मोफत दिले जाते. खते पुरविली जातात. आणि प्रत्येक सभासदास रू. ५ भरून मच्छीमारीकरीता परवानगी दिली जाते.

**४) एकात्मीक जलाशय मत्स्य विकास प्रकल्प :—**

ही राष्ट्रीय सहकार विकास निगम नवी दिल्ली पुरस्कृत योजना जून १९९३ पासून कार्यान्वीत झाली असून राष्ट्रीय सहकार विकास निगम व महाराष्ट्र शासन हयांचे संयुक्त अर्थसहाय्यावर चालत आहे. हि एक महत्वाची योजना आहे. तिचा जास्तीत जास्त फायदा ग्रामिण मत्स्यकार कास्तकारांना घेता यावा. या दृष्टीने मत्स्यपालन सहकारी संस्थाकडे प्रकल्प राबविण्यात आलेले आहे. हि राष्ट्रीय सहकार विकास निगम पुरस्कृत रू. ३.९८ कोटीची योजन मंजुर करण्यात असून १८ जून ९३ रोजी रू. ८१.७५ लाख संघास प्राप्त झाले व ही योजन जुलै ९३ पासूनकार्यान्वीत झाली आहे या योजनेचे उद्देश जिल्हयातिल मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थाच्या निवडक तलावात मत्स्य बिजांची साठवणूक तांत्रीक साहित्य पुरवठा करून अधिक मत्सोत्पादन करणे असे आहे.

**५) हॅचरी प्रकल्प :—**

मत्स्य पालन सहकारी संस्थाना प्रमुख जातीचे मत्स्य बीज कलकत्याहुन आयात करावी लागत असे आता संस्थेच्या तलावातच बिज निर्मीत होवू लागल्याने कलकत्याहुन आयात करणे बंद करण्यात आले. तरंतु तलावात बीज निर्मीती निसर्गावर अवलंबून असल्याने दर वर्षी पाहीजे त्या प्रमाणात बिज निर्मीती होईलच याची खात्री नसते त्या करीता कृत्रिम पध्दतीने मत्स्यबिजाची निर्मीती करणे आवश्यक आहे त्या करीता संघाने मत्स्यबिज उत्पादन केंद्रांची निर्मीती करण्याचे ठरविले असून हे मत्स्यबिज उत्पादन केन्द्र मौजा जाख तालुका भंडारा येथे १६.५१ हेक्टर जागेत उभारण्यात येणार आहे.

**झिंगा प्रक्ल्प :—**

भंडारा जिल्हा मध्यवर्ती सह. बॅक भंडाराचे वतीने झिंगा प्रकल्प राबविण्यात येत आहे. प्रकल्पाअंतर्गत एकुण ५० तळींची निर्मीती झालेली असुन यापैकी ४३ तळीमध्ये १३—४५ लक्ष बीज संचित करण्यात आले होते. झिंगा शेती प्रकल्पामुळे शेतकरी वर्गात या विषयाचे चैतन्य निर्माण होवून येत्या काळात योजनेस चांगला प्रतिसाद मिळून यापासुन संघास सेवाशुल्क मोठया प्रमाणात प्राप्त होणे अपेक्षीत आहे.

**गोडावून बांधणी :—**

राष्ट्रीय सहकार विकास निगमच्या अर्थसाहाय्यावर गोडावून बांधणिचे काम सुरू असून अर्धे काम पुर्ण झाले आहे. हयासाठी साष्ट्रीय सहकार विकास निगम कडून रू ५,३८,७०० मंजूर झाले असून हयात रू ३,२४,३०० कर्ज य १६२,१०० भागभांडवल व रू ९७,३००.०० अनुदान असे एकुण रू २,५६,८५० प्राप्त झाले आहे.

**मत्स्यबिज पालन नर्सरी कार्धा :—**

हि नर्सरी कार्धा येथे ७ एकर जागेत तयार करण्यात आली असून त्यात ३५ संचयन तळी तयार करण्यात आलेले आहेत. हयासाठी वैनगंगा नदीतुन ५ अश्वशक्तीच्या मोटार पंपाद्वारे पाणी घेतल्या जाते प्रथम वर्षी १७ लक्ष शुध्द कटला मत्स्यजिरे संचयण करण्यात आले होते. त्यापासुन १.२० लक्ष बोटकुली उपलब्ध झाली. तसेच सायप्रीनस बिज निर्मीतीचे प्रयोग करण्यात आले व ते यशस्वी सुध्दा झाले. प्रयोगात्मक म्हणुन प्रथम प्रयोगात २.७५ लक्ष सायप्रीनस मत्स्यजीरे निर्मीती करण्यात येवून संगोपण तलावात सोडण्यात आले. त्यापासुन ५ हजार सायप्रीनस बोटकुली प्राप्त झाली शुध्द राहू २५ लक्ष मत्स्यजीरे असे एकुण ३१ लक्ष मत्स्यजीरे संचयण करण्यात आली आहे.

**निष्कर्ष**

प्रस्तुत अध्ययनावरुन प्राप्त झालेल्या निष्कर्षावरुन असे सिद्ध होते की, भंडारा जिल्हयातील मत्सव्यवसाय सहकारी संस्थांचा विविध योजना राबविताना समस्या आहेत. त्याचप्रमाणे प्रस्तुत अध्ययनाच्या आरंभी मांडलेले, भंडारा जिल्हयातील मत्सव्यवसाय सहकारी संस्थांचा व्यवस्थापनाबाबत व तेथील मत्सव्यवसायातील व्यवसायीकांना सहकारी योजनांचा लाभ मोठयाप्रमाणात होत आहे.

**संदर्भ :–**

१. सहकार परिचय, शरदचंद्र कोपर्डेकर, प्रा. सि.जे.जोशी, हिमालय पब्लिशींग हाऊस, गिरगाव
२. सहकारी संस्था अधिनियम १९६०, वं.श.जोशी, प.व.जोशी, न्यायदीप प्रकाशन पुणे
३. भारतीय शेतीचे अर्थशास्त्र, प्रा. डॉ.विद्यार्जन
४. सहकाराची कार्यपध्दती, पाध्ये,कुलकर्णी, विद्या प्रकाशन,नागपुर
५. भंडारा जिल्हा मत्स्य संघाचे अहवाल
६. गोडया पाण्यातील मत्स्यशेती, मत्स्य व्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन
७. भारतीय अर्थशास्त्र, प्रा. सु.पा.देव, प्रा.ग.ना.झामरे, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लीशर, नागपूर
८. कृषि अर्थशास्त्र, विजय कवि मंडन, श्री.मंगेश प्रकाशन,नागपूर